RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २५(४)] मंगळवार, एप्रिल १७, २०१८/चैत्र २७, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे सचिव कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ९ मे २०१७

**उद्देशिका**

**भारताचे संविधान.**

क्र. आरबी/टीसी/ई-१३०१५(३)(२०१५)/एमएलआरसी-२२ए/५३२.— महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी काढलेली पुढील अधिसूचना याद्वारे सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे :—

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) अन्वये, राज्यपाल यांना जाहीर अधिसूचनेद्वारे, असे निदेश देता येतील की, संसद अथवा राज्य विधीमंडळांनी पारित केलेला संसदेच्या किंवा राज्याच्या विधानमंडळाचा एखादा विशिष्ट अधिनियम, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असणार नाही, किंवा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून, त्या राज्यातील एखाद्या अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या एखाद्या भागाला लागू असेल;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे ) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) हा, संविधानाच्या भाग नऊ मधील पंचायतींशी संबंधित असलेल्या तरतुदीं अनुसूचित क्षेत्रांवर विस्तार करण्याच्या हेतूने आणि अनुसूचित क्षेत्रांमधील यथोचित पंचायती आणि ग्राम सभा यांना मोठ्या प्रमाणावर स्वयं-शासनाची सुनिश्चिती करण्याच्या हेतूने, अधिनियमित करण्यात आला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) हा तदअंतर्गत अनुसूचित क्षेत्रासाठी हमी दिलेल्या विविध अधिकारांच्या बाबतीत निर्णय घेताना ग्राम सभा केंद्रीभूत ठेवण्यास मान्यता देतो;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७ द्वारे समाविष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याच्या कलम २२ अ अन्वये, राज्य शासनाला विवक्षित अटींच्या अधीन राहून, सार्वजनिक तसेच खाजगी प्रकल्पांसाठी, गायरान जमिनीचे वाटप करण्याचा अधिकार देण्यात आला आहे;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे ) अधिनियम, १९९६ याच्या कलम ४ (क) नुसार, पंचायतीसंबंधात करता येईल असे कोणतेही राज्य विधि विधान हे रूढिगत कायदा, सामाजिक व धार्मिक प्रथा आणि सामूहिक साधनसंपत्तीच्या परंपरागत व्यवस्थापनाच्या प्रथा यांच्याशी सुसंगत असले पाहिजे ;

**आणि ज्याअर्थी,** पंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे ) अधिनियम, १९९६ याच्या कलम ४ (घ) मध्ये नमूद केले आहे की, प्रत्येक ग्राम सभा, लोकांच्या परंपरा व रूढी, त्यांची सांस्कृतिक अस्मिता, सामूहिक साधनसंपत्ती आणि तंटे मिटवण्याची रूढिगत पद्धती सुरक्षित ठेवण्यास व जतन करण्यास सक्षम असेल ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य महसूल कायदे हे, पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे ) अधिनियम, १९९६ च्या तरतुदीनुरूप असणे इष्ट आहे;

**आणि ज्याअर्थी,** वरील प्रयोजने साध्य करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी आता,** भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या पाचव्या परिच्छेदाच्या उप- परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करीत आहेत आणि पुढील अधिसूचना काढीत आहेत :-

**अधिसूचना**

**भारताचे संविधान**

भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद पाचच्या उप परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे असा निदेश देत आहेत की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ पुढील फेरबदलांसह अनुसूचित क्षेत्रांना लागू होईल :—

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २२ अ च्या पोट-कलम (६) (२०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ द्वारे समाविष्ट केल्यानुसार) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल .—

" (७) या अधिनियमाची पोट कलमे (१) ते (६) किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये, काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, ग्राम सभा ही अनुसूचित क्षेत्रांतील गायरान जमिनी जतन करण्यास, सुरक्षित ठेवण्यास आणि त्यांचे व्यवस्थापन करण्यास सक्षम असेल :

परंतु, अनुसूचित क्षेत्रांतील कोणतीही गायरान जमीन, संबंधित ग्राम सभांच्या पूर्व संमतीशिवाय परिवर्तीत होणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावता येणार नाही.

**स्पष्टीकरण.—** पोट कलम (७) च्या प्रयोजनार्थ " ग्राम सभा " या संज्ञेस, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा ३) याच्या कलम ५४-१अ (ब) मध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.".

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
राज्यपालांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.